महाराष्ट्र शासन
# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

**परिपत्रक :-**

जा. क्र. : तंशिविकापु/विवि-३/२०२२/ 1668
दिनांक : ०७/०४/२०२२ 07 APR 2022

प्रति,
प्राचार्य / संचालक,
या कार्यालयाचे अधिनस्त सर्व शासकीय संस्था,
(पुणे विभाग )

**विषय : शासनाच्या शिष्टाचाराचे पालन करुन वृतपत्रामध्ये मान्यवरांच्या छायाचित्रांसह जाहिराती/ बातम्या प्रसिध्दीस देणेबाबत..**

**संदर्भ** : १. मा.संचालक, यांचे पत्र क्र. १ (२)/तंशिसं/२०२२/२७ दि. ३१/०३/२०२२

शासकीय कार्यालयाकडुन विविध वृत्तपत्रामध्ये शासकीय संस्थाबाबतच्या मान्यवरांच्या छायाचित्रांसह जाहिराती/बातम्या प्रसिध्द करतेवेळी शासनाच्या शिष्टाचाराचे पालन होणे आवश्यक आहे. निम्नस्वाक्षरीकांराच्या असे निदर्शनास आले आहे की, तंत्रशिक्षण संचालनालयाअंतर्गत असलेल्या काही शासकीय संस्थेतील प्राचार्यांकडुन शासनाची/संचालनालयांची कोणतीही पूर्व परवानगी न घेता तसेच शासनाच्या शिष्टाचाराचे पालन न करता मान्यवरांच्या छायांचित्रांगृह जाहिराती/ बातम्या प्रसिध्द केल्या जातात. सदर बाब ही नियमास धरुन नाही.

तरी संचालनालयाअंतर्गत असलेल्या सर्व शासकीय संस्थेच्या प्राचार्यांना सूचित करण्यात येते की, संस्थेच्या/कार्यालयाच्या मान्यवरांच्या छायाचित्रांसह जाहिराती/बातम्या हया शासनाच्या तथा संचालनालयाच्या परवानगी शिवाय प्रसिध्द करु नयेत. शासनाच्या/ संचालनालयाच्या पूर्व परवानगी शिवाय प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिराती/बातम्यांच्या अनुषंगाने संबंधिता विरुध्द नियमानुसार शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्यात येईल व त्यामुळे होणाऱ्या परिणामांची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधित प्राचार्य यांची राहील याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

सोबत :- संदर्भिय पत्र

(श्री मा.रा.जाधव)
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत :- १. प्रोग्रामर,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे यांना तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्याकरीता

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४५०, ४४२, ४४३
ई-मेल – desk1@dtemaharashtra.gov.in वेबसाईट : http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक १(२)/तंशिसं/२०२२/ 27
परिपत्रक

दिनांक : 3 1 MAR 2022

विषय :- शासनाच्या शिष्टाचाराचे पालन करुन वृत्तपत्रामध्ये मान्यवरांच्या छायाचित्रांसह जाहिराती/बातम्या प्रसिध्दीस देणेबाबत...

शासकीय कार्यालयाकडून विविध वृत्तपत्रामध्ये शासकीय संस्थांबाबतच्या मान्यवरांच्या छायाचित्रांसह जाहिराती/बातम्या प्रसिध्द करतेवेळी शासनाच्या शिष्टाचाराचे पालन होणे आवश्यक आहे. निम्नस्वाक्षरीकारांच्या असे निदर्शनास आले आहे की, तंत्रशिक्षण संचालनालयाअंतर्गत असलेल्या काही शासकीय संस्थेतील प्राचार्यांकडून शासनाची/संचालनालयाची कोणतीही पूर्व परवानगी न घेता तसेच शासनाच्या शिष्टाचाराचे पालन न करता मान्यवरांच्या छायाचित्रांसह जाहिराती/बातम्या प्रसिध्द केल्या जातात. सदर बाब ही नियमास धरुन नाही. तरी संचालनालयाअंतर्गत असलेल्या सर्व विभागीय कार्यालयाचे सहसंचालक व शासकीय संस्थेच्या प्राचार्यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या संबंधित संस्थेच्या/कार्यालयाच्या मान्यवरांच्या छायाचित्रांसह जाहिराती/बातम्या हया शासनाच्या तथा संचालनालयाच्या परवानगी शिवाय प्रसिध्द करु नयेत. शासनाच्या/संचालनालयाच्या पूर्व परवानगी शिवाय प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिराती/बातम्यांच्या अनुषंगाने संबंधिता विरुध्द नियमानुसार शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्यात येईल व त्यामुळे होणाऱ्या परिणामांची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधित कार्यालयाच्या सहसंचालक/प्राचार्य यांची राहील याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
0 4 APR 2022
3946

(डॉ.अभय वाघ)
संचालक,
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत :- माहिती व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीकरिता-
१. सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय- मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर
२. प्राचार्य सर्व शासकीय अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र पदविका पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था.